<u>नि. फौ. ख. क्र.३२८/२०२१</u>　　　　　　　　　　निशाणी १९

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – विनायक देवराव पवार

वय – ५७ वर्षे,　　　　　　　　　व्यवसाय – सहा पोलीस उपनिरीक्षक, पो.स्टे. बोरगाव मंजू,

पत्ता – रा. आनंद वाटीका, बायपास रोड, अकोला, ता. जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः</u>**

१. मी बाळापूर पो.स्टे. येथे सन २०१८ ते २०२४ पर्यंत हेकॉ म्हणून कार्यरत होतो. दि.२५.०४.२०२१ रोजी वाडेगाव पोलीस चौकी येथे मी कर्तव्यावर असताना मध्यरात्री ००.३० वा. सुमारास पेट्रोलिंग करीत असताना मला माहिती मिळाली की, तामशी रोड येथून एक ट्रॅक्टर अवैधरित्या वाळू घेऊन वाहतूक करीत आहे, त्यानुसार सदर बातमीची माहिती मी माझे वरीष्ठ श्री. वासाळे यांना दिली. त्यानुसार ते पोलीस चौकी येथे आले त्या ठिकाणी श्री. वासाळे यांनी दोन पंचांना पाचारण केले. त्यानंतर आम्ही सदर बातमीची शहानिशा व नाकाबंदी करण्याकरीता मी, माझा रायटर गणेश गावंडे, श्री. वासाळे व दोन होमगार्ड, दोन पंच यांच्या समवेत तामशी रोडला लागून असलेले श्री. इंगळे यांच्या घराजवळ गेलो तेथे आम्ही नाकाबंदी केली त्यानंतर ००.४० वा. सुमारास एक ट्रॅक्टर तामशी कडून वाडेगावच्या दिशेने येताना आम्हाला दिसता त्यास आम्ही थांबविले. सदर ट्रॅक्टरची पाहणी केली असता त्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये वाळू भरलेली होती. सदर ट्रॅक्टर चालक यास त्याचे नाव विचारले असता त्याने गणेश राहुडकर, रा. वाडेगाव असे सांगितले. त्याच्याकडे सदर रेती बाबत परवाना विचारला असता त्याच्याकडे परवाना नसल्याचे त्याने सांगितले. तसेच ट्रॅक्टरमधील रेती त्याने तामशी येथील नदीपात्रातून आण्यत्याचे त्याने सांगितले. सदर ट्रॅक्टरचा क्र.एमएच३०/बी.बी./११२८ असा होता.

२. सदर मिळून आलेल्या रेतीचा पंचनामा दोन पंचासमक्ष करुन रेती व ट्रॅक्टर जप्त केले. आता मला नि.क्र.१५ व १६ कडील घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आता त्यावर दोन पंच व माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर रेती

व ट्रॅक्टर हा पो.स्टे. ला नेवून आरोपी विरुध्द फिर्याद दाखल केली. आता मला माझी फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२०** देण्यात येत आहे. आता मला छापील फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२१** देण्यात येत आहे. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात उपस्थित नाहीत, त्याच्या ओळखीविषयी त्यांच्या वकीलांमार्फत कोणताही वाद उपस्थीत नसल्याचे सांगितले.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. एम. डोंगरे यांचे मार्फत उलटतपासः</u>**

३. हे म्हणणे खरे नाही की, पो.स्टे. ते घटनास्थळ हे १ ते दीड किमी एवढे अंतर आहे. मला मिळालेल्या अवैध रेती वाहतुकीबाबतची माहिती मी संबंधित महसुल अधिकारी यांना दिलेली नव्हती. घटनास्थळ पंचांना मी लेखी नोटीस दिलेली नव्हती, परंतु त्यांना तोंडी पाचारण केले होते. घटनास्थळाच्या चतुसिमा मी सांगू शकतो. घटनास्थळाच्या पुर्वला वाडेगाव वस्ती मध्ये येणारा रोड, पश्चिमेकडे तामशी व चिंचोलीकडे जाणारा रस्ता, दक्षिणेस शांताराम इंगळे यांच्या घराकडे जाणारा रस्ता व उत्तरेस शेती आहे. ट्रॅक्टरमध्ये असणारी रेती किती होती, याबाबतचे त्याचे मुल्यांकन व वजन केले नाही. आरोपीची जप्ती पंचनामा वर सही घेतलेली होती, परंतु त्याची प्रत आरोपीस दिलेली नव्हती. सदर गुन्ह्याची फिर्याद देण्यापुर्वी संबंधित गावचे तलाठी व इतर महसुल अधिकारी यांना घटनेची माहिती दिली नव्हती. सदर गुन्ह्यातील चोरीस झालेल्या रेतीबाबत तामशी गावातील नदीपात्रातील रेतीचा लिलाव झाला बाबतची माहिती मी प्राप्त केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे लोकवस्ती जवळ होते. सदर ट्रॅक्टरचा क्र.एमएच३०/बी.बी./११२८ असा होता.

४. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासादरम्यान कथन केल्याप्रमाणे कोणतीही अवैध वाहतुकीबाबत घटना घडली नाही. सदर घटनेबाबतची फिर्याद देण्याबाबतचा अधिकार मला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**दिनांकः– १०.११.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.11.10 16:21:02 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | १०/११/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | १०/११/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | १०/११/२०२५ |